# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| अ ‌/ | पोलीस ठाणे | गु र नं कलम | गु घ ता वेळ ठिकाण | गु दा ता वेळ | फिर्यादी | आरोपी | अटक ता. वेळ | गेलेला माल | मिळाला माल | घ/भेट देणारे अधि. | तपास | खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्रांती चौक | 648/2021 कलम 325, 323,324,504,506,34 भादवी | दिनांक .29/10/2021 रोजी दुपारी 03.00वाजता कोतवालपुरा औरंगाबाद | दि. 01/11/2021 रोजी 18.00 वा. | प्रभाकर नामदेव सरग वय-80वर्षे धंदा-सेवानिवृत्त पो.ह.रा-कोतवालपुरा औरंगाबाद सध्या-रा-ऑरेंज सिटी बेस्ट प्राईजचे मागे पैठण रोड औरंगाबाद | 1) पुतण्या गणेश एकनाथ लरज व दोन महिला आरोपी | - | महिला आरोपी फिर्यादी | | | सफौ. चव्हाण | नमुद ता वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन फिर्यादी हे त्यांचे घरासमोर माती टाकत असताना आरोपीतांनी माती टाकण्याच्या कारणावरुन वाद घालुन फिर्यादीस विटा दगड मारले त्यामुळे फिर्यादी चे कानाला जखम होवुन उजव्या खांद्याला हाड फँक्चर झाले आहे तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती म्हणुन मा.पोनिसो यांचे आदेशाने गुन्हा दाखल. |
| २ | क्रांती चौक | 649/2021 कलम 283 भादवी | 01/11/2021 रोजी 17.15 वा पावेतो आम्ही मध्यवर्ती बसस्थानक समोरील रोडवर औबाद | दि 01/11/2021 रोजी 18.09 वा | रामविजय दगुजी निकम ब.नं.पोना/1369 वय-50वर्षे धंदा-नोकरी ने.क्रांतीचौक औरंगाबाद शहर | समीर खॉंन समी उल्ला खॉंन वय-33वर्षे धंदा-अँटो रिक्षा चालक रा-टाऊन हॉल नुर कॉलनी बाबा किराणा जवळ औरंगाबाद | - | | | | पोह/498 पवार | नमुद ता वेळ व ठिकाणी यातील आरोपी हे त्याचे ताब्यातील अँटो रिक्षा क्र. MH.20EF8343ही सार्वजनिक रोडवर लावुन येणारे जाणार-या लोकांचे जिवितास धोका निर्माण होईल अश्यारितीने वाहतुकीस अडथळा निर्माण करताना दिसला. म्हणुन फिर्यादीची त्या चालकाच्या विरोधात भादवी 283 कलमाप्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.म्हणुन मा.पोनिसो यांचे आदेशाने गुन्हा दाखल. |
| ३ | क्रांती चौक | 650/2021 कलम 279,337 भादवी सह कलम 134 मोवाअधि. | 31/10/2021 रोजी 09.45 ते 10.00 वा. सु अदालत रोड, सतीष मोटर्स च्या पुढे काही अंतरावर रोडवर औबाद | दि 01/11/2021 रोजी 20.28वा | भरत आसाराम बोरुडे वय 33 वर्षे धंदा खाजगी नौकरी रा. हनुमान नगर वाळुजगांव जि. औरंगाबाद | अज्ञात वाहन चालक | - | | | | सफौ सुभाष चव्हाण | नमुद ता वेळ व ठिकाणी यातील अज्ञात वाहन चलकाने (आरोपीने)फिर्यादी हे त्यांचे मो सा क्र. MH 20 DA 2541 हिचेवर बसुन सिडको कडे जात असतांना कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीस पाठीमागुन जोराची धडक देवुन जखमी केले आहे. म्हणुन फिर्यादीची धडक देणा-या अज्ञात वाहन चालकाविरुध्द कायदेशीर कारवाई करावी ही विनंती.म्हणुन मा.पोनिसो यांचे आदेशाने गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | जवाहर नगर | गु.र.न. 340/2021 कलम 498(अ),323,504,506 भादवि | दि. 20/08/2020 ते दि. 14/12/2020 पावेतो लक्ष्मीनगर साईनगर,मंठा चौफुली जवळ, जालना | दिनांक 01/11/2021 रोजी 14.14 वा. | महिला फिर्यादी | 1)पती रवि दिलीप कदम वय 25वर्षे, 2)महिला आरोपी 3)सासरे दिलीप कदम,वय 50वर्षे, 4)दिर संदीप दिलीप कदम वय 23वर्षे,5)सुरज दिलीप कदम वय 22वर्षे,6)भरत दिलीप कदम वय 19वर्षे, सर्व रा. लक्ष्मीनगर साईनगर,मंठा चौफुली जवळ, जालना | | | | | पोउपनि गायके | खुलासा- नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी फिर्यादीस लग्नात ठरविल्याप्रमाणे हुंडा दिला नाही,मानपान दिला नाही असे म्हणुन शिविगाळ करुन फिर्यादीचे पतीस एकाचे दोन सांगुन हाताचापटाने मारहाण केली. तसेच अ.क्रं. 1याने फिर्यादीचे चारित्र्यावर संशय घेवुन माराहण करुन उपाशी पोटी ठेवुन फिर्यादीचा शारीरीक व मानसीक त्रास देवुन छळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.म्हणुन गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी मा. पो.नि.सो यांचे आदेशाने पुढील तपासकामी पोउपनि गायके यांचेकडे दिले. |
| ५ | हर्सुल | गु.र.न.338/2021कलम 379 भादवि | गु.घ.ता.वेळ ठिकाण- दि.07/10/2021रोजी 21.00ते दि 8/10/2021 रोजी चे 08.00वाजे | दि 1/11/2021 15.01 | फिर्यादी - शेख अल्ताफ शेख वहाब वय - 35वर्ष व्यवसाय- कॉन्ट्राकटर रा. पंचायत समिती रोड गणेश कॉलनी औरंगाबाद | आरोपी - अज्ञात | | | | | सफौ /वाघ मो नं 9673443030 | खुलासा- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली त्याचा मित्र नामे मुश्ताक खान जाफर खान रा- हर्सुल कैसरपार्क औरंगाबाद यास त्याने त्याची गाडी क्र MH 20 CA 7767 ही कामा निमीत्ता वापरण्या दिली असता त्यानी ती त्याचे घरा समोर हॅन्डल लॉक करुन उभी केली असता ती कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी लबाडीच्या इरादयाने चोरुन नेली आहे म्हणुन गुन्हा दाखल **गेलामाल** -10,000=00रू. किमतीची लाल पट्टाच्या व काळ्या रंगाची हिरोहोन्डा कं.ची मॉडेल असलेली गाडी क्र MH 20 CA 7767 तिचा चेसेस कि.अ. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | हर्सुल | गु.र.नं - 339/2021 कलम 394,34 भादवी | 31/10/2021 रोजी रात्री 11.00 वाजेच्या सुमारास राधास्वाम कॉलनी येथील चर्च जवळ | दि 1/11/2021 17.11 | फिर्यादी-श्रीकांत रामचंद्र देशपांडे वय- 30वर्षे व्यवसाय- खा.नोकरी रा- राधास्वामी कॉलनी औरंगाबाद | आरोपी -अमित अदमाने व तीन अनोळखी इसम | | | | | | पोउपनि. शेख यांचे कडे | यातील फिर्यीदी यांनी तक्रार दिली की दि. 31/10/2021 रात्री 11.00 वाजेच्या सुमारास फिर्यादी हा त्याचे घरी जात असताना राधास्वामी कॉलनी येथील चर्च जवळ वरील तीन अनोळखी व एक फिर्यीदीच्या ओळखीचा असलेला इसम नामे अमित अदमाने यांनी काहीतरी लोखंडी वस्तुने फिर्यादीच्या उजव्या डोळयाच्या खाली लोखंडी वस्तुने मारून दुखापत केली व फिर्यादी खाली पडल्यावर लाथाबुक्याने मारहान केली व फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील रोख रक्कम व मोबाईल जबरदस्तीने काढुन घेऊन पळुन गेले आहे म्हणुन गुन्हा दाखल |
| ७ | एम वाळुज | 1078/21 कलम 65 ख मदका | दिनांक 01/11/2021 रोजी12.00 वाजता रांजनगांव | दिनांक 01/11/2021 रोजी14.36 वाजता | बाबासाहेब एकनाथ काकडे, वय-44 वर्ष, पोलीस नाईक बक्कल क्रमांक 1798, नेमणूक- पो.स्टे. MIDC वाळूज, औरंगाबाद शहर. | अर्जुन राजू काळे, वय-21 वर्ष, रा. सावता माळी मंदिराच्या बाजूला, रांजणगाव शें.पुं., ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. | | | | | | पोह/88 खोसरे | यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली कि, मी ते व सोबत पोना 1173 प्रकाश गायकवाड, पोशि 2511 अविनाश ढगे असे खाजगी मोटार सायकलवर हद्दीत अवैध धंदे व गुन्हेगारांचा शोध घेत पेट्रोलींग करीत असतांना आम्ही दत्तनगर फाट्यावर आलो असता तेथे पोना 1173 गायकवाड यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, ईसम नामे अर्जुन काळे हा सावता माळी मंदिराच्या बाजूला, रांजणगाव शें.पुं. येथे देशी दारूची चोरटी विक्री करीत आहे. सदरची बातमी मिळताच पोना गायकवाड यांनी पंचनाम्यातील नमूद दोन्ही पंचांना दत्तनगर फाटा येथे बोलावून पंच व स्टाफला त्यांनी बातमीची हकीकत सांगून छापा मारणे असल्याचे सांगीतले. त्यावरून छापाला लागणारे साहित्यासह नमूद स्टाफ व दोन्ही पंच असे खाजगी मोटार सायकलवर 11.45 वाजता दत्तनगर फाटा येथून निघून बातमीच्या ठिकाणी सावता माळी मंदिराच्या बाजूला, सदर ईसमाच्या ताब्यात मिळूण आलेला प्रोव्हिबीशन मालाची पाहणी करता त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे. 1)1320-00रू. एका पांढ-या रंगाच्या गोणीमध्ये देशी दारूच्या 180 ml च्या काचेच्या सिलबंद एकूण 22 बाटल्या, एका बाटलीची किंमत 60 रू असे एकूण 22 बाटल्यांची एकूण किं. 1320 रू. अस्या वर्णनाच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | एम वाळुज | 1079/21 कलम 279,337,338भावदी मोटार वाहन कायदा ,134,177 | दि 31/10/2021रोजी 11.30वा सुमारास मी रांजणगाव | दिनांक 01/11/2021 रोजी 15.15 वाजता | अविनाश देविदास त्रिभुवन वय 39 वर्षे धंदा सिव्हील कॉंनट्रॉंक्टर रा प्लॉंट न 7 गौरव अपार्मेट जालन नगर रेल्वेस्टेशन औरंगाबाद | अज्ञात | | | | | पोह/377 देवरे | न.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली कि, दि 31/10/2021रोजी 11.30वा सुमारास मी रांजणगाव येथुन माझी होंडा शाईन मो.सा. क्र MH 20FW 8250 हिने औरंगाबाद कडे येत असतांना आंबेडकर चौक MIDCवाळुज या ठिकाणी माझे समोर डबलसिट मो.सा. स्वराने अचानक कोणताही इशारा न करता यु ट्रन घेतल्याने माझी मो सा सायकल त्याचे सायकल धडकुन मी रोडवर पडलो त्यामधे माझे चेहऱ्याला डोक्याला मार लागुन रक्तश्राव झाला तेव्हा त्या ठिकाणी बरेच लोक जमा झाले त्यांनी मला रोडटे बाजुस केले त्या वेळी सदर मोटार सायकस्वार त्या ठिकाणी न थांबता पळुन त्यामधे माझे डावे पायाचे गुडघ्यावर मार लागला असुन चेहऱ्याला व डोक्याला मार लागुन डावे डोळयाच्या खाली फॅंक्चर झाले आहे सदर अपघातास अज्ञात मो.सा स्वार हे कारणीभुत असुन ते सदर ठिकाणी अपघातानंतर पळुन गेले तरी त्याचा शोध होउन त्याचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेस अशा फिर्यादीवरुन गुन्हा दाखल ... |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | एम वाळुज | 1080/21 कलम 304A,279, 337,338,427,,भादंवि मो वा का. 134,177 | दिनांक 29/11/2021 रोजी17.30ते 22.00 वाजेपावेतो | दिनांक 01/11/2021 रोजी 21.56 वाजता | महिला फिर्यादी | अज्ञात | | | | | पोउपनी/ निर्वळ | यातील फिर्यादी पती पत्नी व मुलांनी सोबत जेवन केले व त्यांनतर माझे पती मला म्हणाले कि, मी थोड्यावेळात बाहेरुन जावुन येतो असे म्हणुन आमची TVS मोटरसायकल क्रमांक नसलेली घेवून बाहेर गेले होते. ते परत घरी आले नाहीत. म्हणून मी माझ्या पतीची वाट पाहत होते. रात्री 11.00 वाजताच्या सुमारास मला माझ्या मावस बहीनीचा मुलगा नामे अशिष प्रविण आठवले व पुतण्या अनिल पांजगे यांनी मला सांगीतले की, माझ्या पतीचा मोटर सायकलवर आपघात झालेला आहे. त्यांना पोलीसांनी फोन करून सांगीतले आहे. पोलीसाच्या गाडी मध्ये पोलीस व आम्ही संजय पांजगे यांना घाटी हस्पिटल मध्ये औषध उपचार कामी घेवून जात आहोत असे सांगीतल्याने मी सुध्दा घाटी हस्पिटल येथे गेले. तेव्हा माझ्या पतीच्या डोक्याला गंभीर मार लागलेला होता. ते बेशुध्द होते ते काही बोलत नव्हते. त्या नंतर डक्टरांनी त्यांना तपासून MLC.NO.1035/PAM/21 दि.29/10/2021 रोजी 22.00 वाजता मयत झाल्याचे सांगीतले. त्या वर पोलीसांनी पोलीस स्टेशनला प्रथम अकस्मात मृत्यु क्र. 137/2021 कलम 174 CRPC प्रमाणे दाखल करण्यात आला होता. व माझे पतीच्या प्रेतावर पी.एम.करून पुढील अंतविधी साठी प्रेत आमच्या ताब्यात दिले होते. दिनांक 29/10/2021 रोजी माझे पती संजय बाबुराव पांजगे वय 40 वर्ष रा. सलमापुरेनगर वडगाव को. हे संध्याकाळी 05.30 वाजताच्या सुमारास आमची विना क्रमांकाची टी.व्ही.एस मोटरसायकलवर बसून कामा निमीत्ताने बाहेर गेले असता एफ सेक्टर मधील ड्युरोवाल कंपनीच्या समोर माझ्या पतीच्या मोटर सायकलला कोणत्या तरी अज्ञात वाहनाच्या चालकाने धडक देवून त्यांना गंभीर जखमी करुन माझे पतीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्या मृत्युस कारणीभूत झालेला आहे. अशा फिर्यदीवरुन गुन्हा दाखल... .. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१  चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | उस्मानपुरा | गु.र. नं.- 255/2021 कलम 394 भा.द.वी | दि. 01/11/2021 रोजी 01.00 ते 01.30 वाजेच्या दरम्याण, रेल्वे स्टेशन बस स्टँड जवळ, औरंगाबाद | दि. 01/11/2021 रोजी 06.26 वा. | रवी कानुजी शेजुळ, वय 34 वर्षे, धंदा रिक्षा ड्रायव्हर, रा. संजयनगर, गल्ली नं. 03, मुकूंदवाडी, औरंगाबाद | अज्ञात इसम | | 5,000 रू.किं. चा सॅमसंग कंपनीचा J-2 मॉडल असलेला ज्यात सिमकार्ड क्र. 9527842191 असा असलेला मोबाईल. | | | API / आर. के. सुर्यतळ, | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे झोपलेले असतांना यातील आरोपीताने फिर्यादीचे खिशात हात घातला असता फिर्यादीने खिशात हात का घातला असे विचारलेचे कारणावरून यातील फिर्यादीस चाकूने डोक्यावर व डाव्या हाताच्या मनगटावर तसेच डाव्या नाका जवळ मारून गंभीर जखमी करून फिर्यादीचे ताब्यातील मोबाईल हिसकावून पळून गेला म्हणुन बाजुस कलमा प्रमाणे गुन्हा दाखल. |
| ११ | सातारा | गुरन 504/2021 कलम 420,34भांदवि सह कलम 66(C),66(D) IT ACT 2000 | 17/06/2019 पासुन दि.10/10/2019 पावेतो ऑनलाइन प्लँट नं 204 पुरंदर निवास सैनिक विहार काचनवाडी औरंगाबाद येथे ऑनलाईन व्दारेo | दि.01/11/21 रोजी 13.49 | फिर्यादी- पंकज नारायण असलकर वय-31 वर्ष व्यवसाय- खा.नोकरी रा.प्लँट नं 204 पुरंदर निवास सैनिक विहार काचंनवाडी औरंगाबाद. | - आरोपी 1) महिला मोबाइल नंबर धारक माहीत नाही 2) राहुल पुर्ण नाव गाव पत्ता माहीत नाही | | | | | श्री एस. जी. माळाळे | नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस जँकपॉट रोबो सॉफ्टवेअर अँप्लीकेशन तयार केले आहे जे शेअर मार्केट, फॉरिन मार्केट करन्शीमध्ये काम करते आणि त्यामध्ये रोबोट काम करतो त्यामध्ये तुमचे नुकसान खुप कमी प्रमाणात होइल असे सांगुन फिर्यास व्हॉट्सअँप मेसेजव्दारे जँकपॉट ट्रेडची बेबसाइट- jackpotfxtrade.com आणि अँप्लीकेशनची लिंक- http://play.google.com/store/apps/details?id=com.jakpot.trades पाठवुन त्यावर अकाउंट ओपन करण्याचे सांगुन फिर्यादीचे कागदपत्रे मागितले व Easebuzz Online Payment Gatway मधुन ऑनलाइन नेट बँकींगव्दारे फिर्यादी व फिर्यादीच्या मित्रास ऑनलाईन पैसे गुंतवण्याचे सांगुन त्यांची एकुण 6,09,340/- रु फसवणुक केली असुन, पोलीस ठाणे सायबर औरंगाबाद शहर यांचे जाक्र 1857 दि.05/09/2020 अन्वये गुंन्हा दाखल करणे बाबत पत्र प्राप्त झाल्याने व फिर्यादी यांनी आज रोजी पो.स्टेला येवुन फिर्याद दिल्याने , मा. पो. नि. सो. यांच्या आदेशाने पोउपनि शिरसाठ यांनी गुन्हा दाखल करुन पुढील तपास मा. पो. नि. सो श्री एस.जी.माळाळे स्वतः करत आहे. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | सातारा | गु.र.नं.505/ 2021 कलम 363 भा.द.वि. | 31/10/2021 रोजी सकाळी 7.30वा रा- सहारा हार्मोणी अपार्टमेंट,नाथव्हँली रोड,कांचन वाडी,औबाद | दि.01/11 /2021रोजी 15.50 | रामनाथ साहेबराव धनवे वय-48 वर्ष् धंदा-खा-नोकरी रा- सहारा हार्मोणी अपार्टमेंट,नाथव्हँली रोड,कांचनवाडी, औरंगाबाद | आरोपी- अज्ञात | | | | | पोउपनि शिरसाठ | यातील फिर्यादीच्या मुली हि दिनांक 31/10/2021रोजी 7.30वाजेचे सुमारास माझी मुलगी ही सिडको येथे क्लासला जाते असे सांगुन माझी मुलगी अकांशा ही माझी ग्रेरे कलरची एक्टीव्हा गाडी नंबर MH-20-DS-4231हि गाडी घेवुन सिडको येथे क्लासला जाते असे सांगुन घरातुन निघुन गेली.आहे.आज पावेता परत आली नाही. आम्ही तिची मैत्रीनीकडे,आसपास नातेवाइकाकडे,आजुबाजु परिसरात तिचा शोध घेतलर आसता ति मिळुन आली नाही. हि अल्पवयीन असल्याने तिस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले असावे वगैरे फिर्यादीवरुन पो.नि.सो.यांच्या आदेशाने सपोनि कराळे यांनी गुन्हा दाखल आहे. |
| १३ | सिटी चौक | गु.र.न.527/ 2021 कलम 324,323,504,506,34 भादवी | 31/10/2021 रोजी संध्याकाळी 07.15 वाजेच्या सुमारास क्वार्टर न.06 विश्वासनगर लेबर कॉलनी औरंगाबाद | दि.01/11 /2021रोजी02.24 वा.दाखल | फिर्यादी नामे:- शेख हमीद शेख अहेमद वय 47 वर्षे व्यावसाय- ड्रायव्हर रा.क्वार्टर न.6 विश्वासनगर लेबर कॉलनी औरंगाबाद | आरोपी नामे:- 1)सय्यद पाशा सय्यद करीम वय अंदाजे 35 वर्ष धंदा रिक्षा ड्रायव्हर , 2) सय्यद खालेद सय्यद करीम वय28वर्ष धंदा कँटरर्स 3) महिला आरोपी | | | | | पोह 1511मेहेबुब | यातील फिर्यादी व आरोपी क्र.1 व2हे मेहुणे व साले असुन आरोपी क्र.3 ही आरोपी क्र.2ची बायको असुन फिर्यादीचे बायकोचा व आरोपी क्र.01याचा वडीलोपार्जीत शेतीचे विक्री वरुन वाद असुन त्या कारणा वरुन आरोपीनी संगनमत करुन फिर्यादीचे पत्नीस शिवीगाळ केली असता फिर्यादी त्यांना समजावुन सागण्यास गेला असता आरोपींनी त्याला शिवीगाळ करुन आरोपी क्र.01व02 यांनी फिर्यादीचे हात धरुन त्याला व त्याचे बायकोस हाताचापटाने मारहाण केली त्यावेळी आरोपी क्र.03 हिने पाठीमागुन कसल्या तरी धारदार वस्तुने फिर्यादीचे डोक्यात मारले त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटुन रक्त निघाले त्यानंतर आरोपींनी फिर्यादी व त्याचे पत्नीस जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सिटी चौक | गु.र.नं. 528/2021 कलम 188,286,336 भा.द.वी. सहकलम महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 33/एच/131 सहकलम स्पोटक पदार्थ अधिनियम 1884 कलम 9 ब | 01/11/2021 रोजी चे 15.55 ते 17.50 वाजे दरम्यान चौराह, जना मोंढा औरंगाबाद | दि.01/11/2021रोजी21.21 वा.दाखल | फिर्यादी - संजय मोहन नंद वय 44 वर्षे व्यवसा - शा. नोकरी पोना/1636 ने. पो.स्टे. सिटीचौक हरीमशिद जवळ नवामोंढा औरंगाबाद औरंगाबाद शहर. | 1) जितेंद्र रमेश नरवैय्ये वय 38 वर्षे रा रोहीदास पुरा ग.नं. 2 भवानीनगर औरंगाबाद 2) कृष्णकुमार बाबुलाल ढोकरीया वय 45 वर्षे रा. दिशा संकुल आर – 2 गारखेडा औरंगाबाद 3) संतोष सुधाकर तुपकर वय 49 वर्षे व्यवसाय – व्यापार रा. कैलास नगर ग.नं. 4 औरंगाबाद 4) सुरेश दिंगबर गुरुभैय्ये वय 60 वर्षे रा. लक्कडमंडी | | मिळाला माल - येणे प्रमाणे एकुण 20401-00/रुपये वरील वर्णनाचे व किंमतीचे फटाके मिळुन आले | | | पोना/1875 तायडे | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र. 1ते 4 यांनी विना परवाना बेकायदेशीर पणे अवैध रित्या गर्दीत,सार्वजनिक ठिकाणी दुकानात फटाके (स्फोटक पदार्थ -ज्वालागृही )जवळ बाळगुन लोकांचे जिवीता पोहचणा-या संभाव्य धोक्या पासुन सुरक्षीत राहणेस जाणीवपुर्वक बंदोबस्त न करता तसेच इतरांची व व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात आणुन शासकीय आदेशाची उल्लघंन केले म्हणुन गुन्हा दाखल |
| १५ | सिटी चौक | 529/2021 कलम 279, भादंवी सह 134 मो वा कायदा | 01/11/2021 रोजी सायंकाळी 04.00वा. शहागंज रिक्षा स्टॅन्ड जवळ मनपा दवाखान्या समोर औरंगाबाद | दि01/11/2021रोजी23.06 वा दाखल | फ मोहम्मद शकील मोहम्मद अब्दुल गणी अन्सारी वय 55 वर्षे धंदा टेलर रा. फुलेनगर हर्सुल औरंगाबाद आधार कार्ड | आरोपी -कार क्र.MH21C-2902 लाल रंगाच्या सुझुकी कार चालक नाव पत्ता माहीत नाही | | | | | मपोह/1911प पातोड | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी दि. 01/11/2021 रोजी सायंकाळी 04.00वा. सुमारास मी चेलीपुरा चौकातुन शहागंज भाजीमंडई येथे पायी जात असतांना शहागंज रिक्षा स्टॅन्ड जवळ मनपा दवाखान्या समोर माझे पाठीमागुन कार क्र.MH21C-2902 लाल रंगाच्या सुझुकी कार चालक नाव पत्ता माहीत नाही त्याचे ताब्यातील कार हायगईने व निष्काळजीपणाने चालवुन कारचे समोरील टायर माझे उजव्या पायाचे पंजावरुन घालुन मला जखमी केले. वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | मुकूंदवाडी | गुरन 433/2021 कलम 457,380, भादवी | 31/10/2021 रोजी 21.00 वा.पासुन ते दि.01/11/2021 रोजी सकाळी 07.00वाजे दरम्यान | दि01/11/2021 रोजी 15.53 वा | विजय गेनमल कटारीया वय 56 वर्ष व्यवसाय व्यापार रा. एन.3 प्लॉट नं.354 सिडको औरंगाबाद | अनोळखी | | | | | पोउपनि श्रीकांत भराटे | खुलासा-नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे ऑफीसचे ऑफीसच्या दरवाजाचे कुलुप तोडून ऑफीस मधील टि.व्ही.व लॅपटॅाप कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले आहे म्हणुन बाजुल प्रमाणे गुन्हा दाखल<br>**गेलामाल**<br>5000/-रु.किमतीची एक व्हीडीओकॉन कंपनीची काळ्या रंगाची LCDटि.व्ही.जु.वा.कि.अं.<br>2) 25000/- रु.किमतीचा एक एस.आर.कंपनीचा लॅपटॅाप जु.वा.कि.अ |
| १७ | मुकुंदवाडी | गुरन 434/2021 कलम 454,457,380 भादवी | 31/10/2021 रोजी 10.00 वा.पासुन ते दि.01/11/2021 रोजी सकाळी 07.00वाजे दरम्यान जयभवानीनगर ग.नं.12 मुकुंदवाडी औरंगाबाद | दि01/11/2021 रोजी 16.23 वा सु | महिला फिर्यादी | अनोळखी | | 1) 22,000/-रु.रोख ज्यात 500 रु.च्या 44 नोटा.<br>2) 15,000/-रु.किमतीच्या 20 साड्या व मुलीचे 6 ड्रेस जु.वा.कि.अ | | | | खुलासा-नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे ी नेहमीप्रमाणे पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स एन.3 सिडको येथे कामाला गेले असता फिर्यादी यांचे शेजारी राहणाऱ्या महीला यांनी मला फोन करून सांगितले की, तुमच्या घराचे लॉंक तुटलेले आहे. असे सांगितल्यावरून मी माझ्या घरी लगेच 07.30 वा.सु आले व पाहीले असता घराचे दरवाजाचे कडी कोंडा तुटलेले दिसले. त्यावरुन संशय आला की कोणीतरी अज्ञात चोरट्यांने घरात प्रवेश करुन चोरुन नेले आहे म्हणुन बाजुल प्रमाणे गुन्हा दाखल |
| १८ | मुकुंदवाडी | गुरन 435/2021 कलम म.दा.बं.का. कलम 65 (ख) प्रमाणे | दिनांक 01/11/2021 रोजी 13.30वा सु रेल्वे गेट नं. 56 मुकुंदवाडी औरंगाबाद | दि01/11/2021 रोजी 17.52 वा | सुधाकर साहेबराव पाटील वय 34 वर्षे, पोशि/2831 ने.पोलीस ठाणे मुकूंदवाडीे, औरंगाबाद (शहर | जगन्नाथ शंकर बुजाडे, वय-30 वर्षे, रा. संतोषीमाता नगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद | | 720 /-रु. किं. च्या एकुण 12 देशी दारु भिंगरी संत्रा, उत्पादक कर्मविर शंकरराव काळे सह.सा.का. लि. असे | | | | खुलासा-नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की नमुद आरोपी हा देशी दारु भिंगरी संत्राच्या बाटल्या विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत: च्या ताब्यात व कब्जात बाळगतांना मिळुन आला म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कलम 65 (ख) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | मुकुंदवाडी | गुरन 436/2021 कलम 498(अ)323,504,506, 34 भादवी व सह कलम 3,4हु.प्रति. अधिनियम | दि दिनांक 26/07/2020 रोजी ते आज पावेतो पळशी( खु . ) , पो . पिशोर , ता . कन्नड , जि . औरंगाबाद | दि01/11/2021 रोजी 19.41 वा | महिला फिर्यादी | 1) महेंद्र भास्कर बागुल , 2) तिन महिला आरोपी रा . पळशी ( खु . ) , पो . पिशोर , ता . कन्नड , जि . औरंगाबाद | | | | | पोउपनि सुखदेव काळे | खुलासा-नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तु तुझे माहेरहुन चारचाकी गाडी घेण्यासाठी पाच लाख रु . घेवुन ये , तरच तुला नांदव नसता तुला नांदवणार नाही , असे म्हणुन मला वेळोवेळी मारहाण करुन वाईटसाईट शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवुन मला वेळोवेळी उपाशीपोटी ठेवुन मानसीक , शारीरीक त्रास देवुन छळ केला व मला माझे माहेरी आणुन सोडल म्हणुन बाजुल प्रमाणे गुन्हा दाखल |
| २० | मुकुंदवाडी | गुरनं 437/2021 कलम 363 भा द वि | दि स्वराजनगर गेट नं.56 मुकुंदवाडी औरंगाबाद. 01/11/2021 रोजी वेळ अंदाजे 11.30 ते 12.00 वा.सु. | दि01/11/2021 रोजी 21.49 वा | भाऊसाहेब पंढरीनाथ जाधव वय- 44 वर्ष व्यवसाय- मजुरी रा- स्वराजनगर गेट नं.56 मुकुंदवाडी औरंगाबाद. | अनोळखी | | | | | पोउपनि गुळवे | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे नेहमीप्रमाणे कामानिमित्त बाहेर गेले व फिर्यादी यांची पत्नी ही भांडीकाम करण्यासाठी गेली व तसेच मोठा मुलगा महानगर पालिकेत कामाला गेला घरी लहान मुलगा हा आजारी असल्याने तो व माझी मुलगी दोघेच घरी होते.फिर्यादी कामावर असतांना पत्नी हिचा फोन आला व तिने सांगितले की, तुम्हांला सरस्वती हिचा फोन आला का? ती घरी नाही आहे.असे तिने मला सांगितले.त्यानंतर मी संध्याकाळी 06.00 वा.सु.कामावरुन घरी आलो त्यावेळी माझी मुलगी ही घरात दिसुन आली नाही.त्यावरुन आम्ही तिचा आजुबाजुला नातेवाईकांकडे चौकशी केली असता मला माझी मुलगी मिळुन आली नाही म्हणुन बाजुल प्रमाणे गुन्हा दाखल |
| २१ | सिडको | गु.र.न. 717/2021 कलम-354 (ड),34 भादवि सह कलम 66 ( C) (D) माहीती तंत्रज्ञान अधिनीयम | दि.28/08/2021 रोजी प्लॉट नं 16 अगस्ती हौसिंग सोसायटी एन-9 सिडको औरंगाबाद | दिनांक 01/11/21 वेळ-25 नोंद क्र. 12.54 | महिला फिर्यादी | 1) आकाश रमेश हडुळे रा. श्रीकृष्ण नगर एन-9 सिडको औरंगाबाद 2) धारक मयुर मिलींद चिंचोळकर रा प्रतापनगर एन-9 औरंगाबाद | | उशिराचे कारण – सायबर पोलीस ठाणे औरंगाबाद येथे अर्ज चौकशीमध्ये मा.वरिष्ठांचे आदेशाने गुन्हा दाखल | | | दुय्यम पोनि सलगरकर | -नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचे घरी असतांना त्यांचे इंन्स्टाग्राम वर Dr.Vrussshh हे खाते होते.परंतु यातील आरोपी क्रं.1 व 2 यांनी त्यांची सोशल मिडीयावर ओळख लपवुन फिर्यादी यांचे नावाने Vrushali_Kharche878 हे बनावट खाते तयार करुन त्यावर फिर्यादी यांचे फोटो अपलोड केले.व सोशल मिडीयावर फिर्यादी यांचा पाठलाग केला म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | छावणी | 575/2021 कलम 461, 380, भादवी | दि.31/10/2021रोजी 22.00 ते दिनांक- 01/11/2021 रोजी 07.30 वा.दरम्याण प्लॉट नं.01 गोविंदा टॉवर छत्रपती शिवाजी महाराज चौक विकासपुरी पडेगाव औरंगाबाद | दिनांक- 01/11/2021 रोजी 19.08वा | श्रीराम सुरेश कुंदे वय.29 वर्षे व्यवसाय- व्यापार रा.प्लॉट नं.01 गोविंदा टॉवर छत्रपती शिवाजी महाराज चौक विकासपुरी पडेगाव औरंगाबाद | अज्ञात | | | | | खाजेकर | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे गोविंदा मेडीकल दुकान व गोविंदा मॉल तसेच त्यांचे बाजुला असलेले शेख कलीम यांचे पॅसेफिक लॅब दुकानाचे शटरचे सेंट्ल लॉक व कुलुप कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडुन शटर उचकटुन दुकानामध्ये प्रवेश करुन वर नमुद वर्णनाचा व किमतीचा माल स्वताचे फायद्यासाठी चोरुन नेला आहे. गुन्हा दाखल.<br>**गेलामाल** 1)5500/-रुपये रोख रक्कम ज्यात 2000/-रुपये दराची 01 नोट,500/-रुपये दराच्या 04 चलनी नोटा,100/-रुपये दराच्या 15 चलनी नोटा.<br>2)3858/- रुपये कि.माल ज्यात 1)1600/-रुपये परफ्युमच्या 8 बाटल्या 200/-रुपये दराच्या, 2)702/-रुपये कि.केशकिंग तेल च्या 03 बाटल्या प्रत्येकी किं.234 रुपये,3)256/-रुपये कि.पॅराशुट च्या 04 बाटल्या प्रत्येकी कि.64 रुपये,4)600/-रुपये कि.चा नानप्रो एक नग,5)100/-रुपये कि.चे पॅड 10 नग प्रत्येकी किं.10/-रुपये,6)600/-रुपये किमतीची एक कॉलेज बॅग ज्यात गोविंदा मेडीकलचे राऊंड सिल स्टॅम्प व शिक्के व सेंट्रल लॉकचे चावी 06 नग.<br>3)3300/-रुपये किमतीचा माल एक LG कंपनीचा Computr मॉनिटर,व UPS,व सँमसंग मोबाईल चार्जर.(शेख कलीम यांचे पॅसेफिक लँबमधील).<br>एकुण-12658/-रुपये |
| २३ | छावणी | 576/2021 कलम 304(A), 279,337, भादवी | 1/11/2021 रोजी 18.40 वाजेच्या सुमारास फौजी ढाब्यासमोर मेन हायवे रोडवर मिटमीटा परिसर औरंगाबाद | दिनांक.1/11/2021 रोजी 23.07वा | योगेश कमलाकरराव दैठणकर वय26वर्ष धंदा व्यापार रा. शिवशकंर कॉलनी प्लॉट नं.102 माऊली निवास औरंगाबाद | ट्रक क्र. MH 20EL-0978च्या चालकाने | | | | | पोउपनि डाके | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील हायवा ट्रक क्र. MH 20EL-0978,च्या चालकाने त्यांचे ताब्यातील हायवा हा भरधाव वेगात हागईयने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वडिलांचे मो. सा. क्र MH 20V 2350ला समोरुन जोराची धडक दिल्याने फिर्यादीचे वडिल व माझे शेजारी सुरेश खंडागळे यांना गंभिर जखमी करुन त्यांच्या मरणास कारणीभुत झाला व दुसरा मो.सा चालक चरण वाघमारे याचे मो. सा ला पण जोराची धडक दिली त्यात तो पण गंभिर जखमी झाला आहेत.सदर हायवा चालकाने त्याचे ताब्यातील हायवा घटनास्थळी सोडुन पळुन गेला आहे. म्हणुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | वेदांत नगर | गुरनं 286/2021 कलम- 65(ई) म.दा.अ. | दिनांक 01/11/2021 रोजी 12:00वा.सुमारास रेल्वस्टेशन ईनगेट समोर, औरंगाबाद | दि. 01/11/2021 रोजीचे .2041 वा. | माणीक दगडु नागरे,पोहेकॉ/1217,वय- 51वर्षे,नेमणुक वेदांतनगर पो.स्टे.औरंगाबाद शहरसरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी मागील सुमारे चार वर्षापासुन नेमणुकीस असुन जनरल ड्युटी करतो. | नाव-बद्रीलाला बिहारीलाल जैस्वाल वय- 74वर्ष रा.घर नं.-06-12-612,लाईन नं.-05 तिरंगा चौक जवळ,राहुलनगर परिसर औरंगाबाद. | | | | | पोहेकॉ/313 राठोड | खुलासा- नमुद तारीख,वेळी व ठिकाणी यातील ईसम आरोपी हा विनापरवाना, बेकायदेशिरित्या वरील वर्णनाचा व किमतीचा प्रोहिबीशन गुन्हयाचा मुद्देमाल देशी दारु भिंगरी संत्राच्या बाटल्या स्वत:च्या जवळ व ताब्यात कब्जात स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगतांना मिळुन आल्याने सदर ईसमा विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम 65 (ई) प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे. म्हणुन डीओ मपोउपनि/लाटेसो यांचे आदेशाने गुन्हा दाखल<br>**मिळाला माल** 1) 900=00 रुपये किमतीच्या एकुण-15 काचेच्या 180 ML क्षमतेच्या देशी दारुच्या सिलबंद बाटल्या ज्यावर लाल व पिवळे लेबल चिटकवलेले त्यावर देशी दारु भिंगरी संत्रा असे लिहीलेले प्रत्येकी 60/-रुपये किमतीच्या 2) 00=00 रुपये किमतीची पिवळया-नीळया रंगाची पीशवी जु.वा. कि.अ.00=00 रुपये 900=00 एकुण येणेप्रमाणे |
| २५ | पुंडलीक नगर | 437/2021 कलम 379 भादवी. | दि.29/10/2021 रोजी 09.17 ते 17.00 .सु. एन.3 सिडको औरंगाबाद | दि.01/11/2021 रोजी 16.13 वा. | सुभाष रामभाऊ शेजुळ वय42 वर्ष. धंदा-चालक रा.चिखलठाणा , सावित्री नगर औरंगाबाद | अनोळखी | | हिरो हिरो कंपनीची स्लेडर प्रो.काळ्या रंगाची मो.सा.क्र.MH 20 CV 3841 . | | | पोह 508 जाधव | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील अज्ञात आरोपीने हॅन्डल लॉक करुन लावलेली नमुद वर्णनाची मो.सा. स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी चोरुन नेली.म्हणुन गुन्हा दाखल. |
| २६ | पुंडलीक नगर | 438/2021 कलम 279,427 भादवी | दि.01/11/2021 रोजी 03.00 वा.सु. शिवाजीनगर क़डुन सातारा परिसरकडे | दि.01/11/2021 रोजी 18.49 वा. | संजय सुभाष नव्हाडे वय45 वर्ष. धंदा-खाजगी.रा.आयप्पा स्वामी मंदीर जवळ सातारा परिसर औरंगाबाद | फिरोज बाबुलाल सय्यद रा.चांगतपुरी ता.पैठण जि.औरंगाबाद | | | | | पोह 1556 बि-हाडे | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील हायवा क्र.MH 20 EL 4053 च्या चालकाने त्याची हायवा भरधाव वेगात व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीच्या कारला धडक देऊन नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | पुंडलीक नगर | 439/2021 कलम 324,504, 34 भादवी. | दि.01/11/2021 रोजी 04.00वा.सु. भारतनगर | दि.01/11/2021 रोजी 21.26 वा.सु. | योगेश विलास घाटरे वय40 वर्ष. धंदा-किराणा दुकान रा.बालाजी नगर औरंगाबाद. | 1.गुड्या पुर्ण नाव माहीत नाही 2.सोबत तीन अनोळखी. | | | | | स. फौ. मुढे. | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने आरोपीतांना दुकानाजवळ थांबुन दारु सिगारेट पिऊ नका व येथुन निघुन जा असे म्हणल्याच्या कारणावरुन शिवीगाळ करुन लाकडी दांडा डोक्यात मारुन डोके फोडुन जखमी केले त्याच्यासोबतच्या तीन इसमानी सुध्दा शिवीगाळ केली.म्हणुन गुन्हा दाखल. |
| २८ | पुंडलीक नगर | 440/2021 कलम 406 भादवी | दि.01/11/2021 रोजी 10.45 वा,सु त्रिमुर्ती वाटर प्युरीफायर सेव्हन हील औरंगाबाद. | दि.01/11/2021 रोजी 21.51 वा. | महिला फिर्यादी | अनोळखी | | | | | पो,उपनि. माने | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीताने वाटर प्युरिफायर विकत घेण्याचा बहाना सांगुन आरोपीताचे डेबीट कार्ड ब्लॉक झाले आहे ते ओपन करण्याचा बहाणा सांगुन लॅपटॉप घेऊन गेला .म्हणुन गुन्हा दाखल. |
| २९ | बेगमपुरा | 444/2021 कलम 498(अ),323,504,506, 34 भादवी | माहे मे 2020 पासुन ते दि. दि. 25/07/2021 रोजी सकाळी 10.00वाजेच्या पावेतो कोहीनुर कॉलनी गयासखान नाबीना मश्जिद जवळ औरंगाबाद | दि 01/11/2021 वेळ 16.25 वा | महिला फिर्यादी | 1) अब्दुल गफ्फार शेख कय्युम 2) शेख कय्युम उर्फ (नवाब साहाब) 3) अब्दुल रहीम शेख कय्युम 4) अब्दुल रउफ उर्फ सुलतान शेख कय्युम 5) चार महिला आरोपी सर्व रा कोहीनुर कॉलनी पानचक्की जवळ औरंगाबाद | निरंक | निरंक | | | पोउपनि राठोड | न.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीस तीचे सासरकडील लोकांनी वांरवार पैशाची मागणी करुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहान करुन घरातुन हकलुन दिले. फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ केला वगैरे तक्रारी वरुन मा.पो.नि.सो यांचे आदेशाने पोउपनि राठोड यांनी गुन्हा दाखल करुन तपास स्वत: कडे घेतला. |
| ३० | जि-सी | गुरनं - 443/2021 कलम 363 भादवी | 31/10/2021 रोजी रात्री 20.00 वा अल्तमश कॉलनी ,सहारा हॉस्पिटल च्या पाठीमागे औरंगाबाद | दि.01/11/2021रोजी 02.20वा | महिला फिर्यादी | अज्ञात | | | | | पोउपनि अशफाक शेख | खुलासा - नमुद ता .वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने आपली मुलगी हिस रागावल्याने ती घरात काही एक न विचारता निघुन गेली यातील फिर्यादीने अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी तिचे अपहरण केले आहे. अशी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करुन पुढील तपास पोउपनि अशफाक शेख यांच्याकडे दिले. |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०२/११/२०२१ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | एम सिडको | गु.र.न.452/ 2021 कलम 454 ,380भादवी | दि 31/01/2021 रोजीचे 09:30 ते 15:00 वाजेच्या सुमारास प्लाँट न.172 सेक्टर B, N1सिडको, औरंगाबाद | दि. 01/11/21<br>वेळः- 14:16 | रवी शेषराव जाधव वय 38 वर्षे धंदा स्टेट बँग अँफ इंडीया टाऊन सेंन्टर ब्रँच येथे मँनेजर रा. प्लाँट न.172 सेक्टर B, N1सिडको,औरंगाबाद | अज्ञात | -- | 1)15,000/- रुपये जु.वा.कि.अ. LED TV, AOC कंपणीची काळ्या रंगाची माँडेल न. LE32V30 M5/61प्रोडक्ट -LED LCD TV | | | पोह/ 1916 ओहळ | खुलासा - नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे कामानिमित्त घर बंद करुन घरास लाँक लावुन कुटुंबासह बाहेर गेले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या घराचे लाँक कडी कोंडा तोडुन व दरवाजा उघडुन घरात प्रवेश करुन घरामध्ये भिंतीला लावलेला AOCकंपणीची काळ्या रंगाची LED TV स्वताहाच्या फायद्यासाठी चोरुन नेला आहे.अशी फिर्यादीने फिर्याद दिल्यावरुन डि ओ अधिकारी चौरे यांनी गुन्हा दाखल केला |
| ३२ | एम सिडको | गुरनं 453/2021 कलम 452,323,504,506 IPC | 01/11/2021 रोजी 17.30 वा. सुमारास, फिर्यादीचे घरात शिवाजी महाराज पुतळ्याजवळ भाजीमंडी नारेगाव औरंगाबाद | दि. 01/11/21<br>वेळः- 22:52 | महिला फिर्यादी | शेख हकीम शेख ताज वय- अंदाजे 35 वर्षे रा - पडेगाव ता -जि . औरंगाबाद | | | | | पोउपनि श्री सोनगिरे | खुलासाः- यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे ओळखीचे असुन वरील ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीने अचानकअनधिकृतरित्या/बेकायदेशिररित्या फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीस ," तु यापुर्वी माझ्या विरोधात विनयभंगाची तक्रार का दिली होती?" असे म्हणुन वाद घालुन शिविगाळ करुन फिर्यादीस हाताचापटाने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा पो.ठाणे अंमलदार पोह/234 जैस्वाल यांनी दाखल करुन पुढील तपास मा.पो.नि.यांचे आदेशाने यांना दिला. |

Sd/-

( **विशाल ढुमे** )

सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)

पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर.

करीता.